# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२२/०६/२०१६.

**१) तांब्याच्या ताराची चोरी. :—**

दिनांक २१/०६/२०१६ रोजी ०१.०५ वा. दरम्यान अज्ञात चोराने सिरसी शेतशिवार रेल्वेलाईन स्मशानभुमी जवळील आयुध फॅक्ट्री यांच्या अंर्तगत येणा—या उपरी उपसकर रेल्वेचे पोल क्र. १०७२/ओ.एफ.—१२ ते १०७२/ओ.एफ.—१३ पर्यतचा ताब्यांचा तार वजन अंदाजे ६ कीलो कि. १०००/— रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कापुन चोरूण नेण्याचा प्रयत्न केला. असे फिर्यादी समिरकुमार विजयकुमार मादक वय ५७ वर्ष, रा. उपरी उपसकर कार्यालय देव्हाडी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,५११ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी. :—**

दिनांक २०/०६/०१६ रोजी १२.३० ते २२.३० वा. दरम्यान फिर्यादी देवानंद ताराचंद नंदेश्वर वय ३८ वर्ष, रा. खुटसावरी यांनी त्यांची मोटार सायकल क्र. एमएच ३५ जे २७७१ कि. १८,०००/—रू. ची ही लोकमत जिल्हा कार्यालयाच्या खुल्या परीसरात ठेवली होती. फिर्यादी हे लोकमत जिल्हा कार्यालय येथुन परत आले, तेव्हा त्यांना ठेवलेले ठिकाणी त्यांची मोटार सायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी पाहुन मोटार सायकल चोरून नेली. असे फिर्यादिचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास स.फौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक २१/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, लाखंदुर व दिघोरी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारू कि. ३५०/—रू. व ०४ लिटर ४१० मि.ली. देशी दारू कि. ३१,३४०/—रू. तसेच जुगारातुन कि. १३५/—रू असा एकुण कि. ३१,८२५/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष**, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.